# सकल क्षेत्रात मराठीचा वापर करावा : प्रा. हैबतकर

देगलूर, ता.२ (बातमीदार) : मराठी भाषा ही मानवी व्यवहारक्षेत्रे आणि ज्ञानक्षेत्रात हेतुपुरस्परपणे वापरली पाहिजे, परभाषेतील शब्दसंपदा मुळ आशयासह सुलभपणे मराठीत आणण्याचा युवकांनी प्रयत्न केला पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. माधव हैबतकर यांनी केले. ते देगलूर महाविद्यालयात भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त अभ्यागत व्याख्यानमालेत बोलत होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

डॉ. हैबतकर 'मराठी भाषा विकासात युवकांची जबाबदारी' या विषयावर बोलताना पुढे म्हणाले की, समकालीन सकल मानवी जीवनात साहित्य व्यवहारात मराठीचा लीलया संचार झाला पाहिजे. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विठ्ठल जंबाले यांनी केले. अध्यक्षीय मनोगतातून डॉ. चिद्रावार यांनी प्रस्तुत कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. तसेच समन्वयक डॉ. राजेश्वर दुडुकनाळे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

याप्रसंगी उपप्राचार्य निवृत्ती गोविंदवार, प्रा. लक्ष्मणकुमार सुदाम, डॉ. रत्नाकर लक्षेटे, डॉ. सर्जेराव रणखांब, डॉ. माधव चोले आणि शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी तथा विद्यार्थी दुरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होते.